केंद्र पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) योजनेकरिता अनुसूचित जाती प्रवर्गाचा सन २०२०-२१ करिताचा निधी सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून वितरीत करण्याबाबत.
केंद्र हिस्सा ( लेखाशिर्ष २४०१बी०८१)
राज्य हिस्सा ( लेखाशिर्ष २४०१बी०९९)

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :-राफअ-२०२०/प्र.क्र.२२५/९-अे**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २५ नोव्हेंबर, २०२१

**संदर्भ :-**
१) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३,दिनांक ०६/०४/२०२१.
२) वित्त विभाग,शासन निर्णय: अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३,दिनांक २४ /०६/ २०२१.
३) केंद्र शासन,कृषी आणि शेतकरी कल्यान मंत्रालयाचे पत्र क्रमांक F.No.१८-२४/२०१७/MIDH, दि.२२/०३/२०२१.
४) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक: राफअ-२०२०/प्र.क्र.२२५/९-अे, दिनांक ३१ मार्च, २०२१.
५) कृषि व पदुम विभाग,शासन निर्णय क्रमांक:राफअ-२०२१/प्र.क्र.१४०/९-अे, दि.२७ जुलै, २०२१.
६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्रमांक:बीजीटी-२०२१/प्र.क्र.१३/अर्थसंकल्प (विघयो), दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१.

**प्रस्तावना:-**

सन २०२१-२०२२ मध्ये राज्यात कृषी उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यासाठी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ व २ च्या शासन निर्णयान्वये राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली महामारीची परिस्थिती विचारात घेऊन सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरणाची कार्यप्रणाली ठरवून दिलेली आहे. वित्त विभागाने दिलेले निर्देश विचारात घेऊन विभागाने केंद्र पुरस्कृत योजनेसाठी अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीची पुर्नरचना केल्यानूसार सदरहू योजनेची सन २०२१-२०२२ मध्ये अमंलबजावणी करण्यासाठी संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णयान्वये एकुण रुपये १७८१४.१२ लाख एवढया रक्कमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

केंद्र पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान ( MIDH) या योजनेसाठी अनुसुचित जाती घटकांसाठी केंद्र हिस्सा ( २४०१बी ०८१) या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता रुपये १५४०.०० लाख तसेच त्यासमरुप राज्य हिस्सा ( २४०१बी०९९ ) या लेखाशिर्षाखाली रुपये १०२७.०० लाख असा एकुण रुपये २५६७.०० लाख एवढा निधी अर्थसंकल्पीत आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने केंद्र पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) या योजनेकरिता अनुसुचित जाती प्रवर्गाकरिता सन २०२०-२१ करिता प्राप्त झालेला केंद्र हिस्सा रु.४५५.००लाख तसेच राज्य हिस्सा रुपये ३४३.०० लाख असा एकुण रुपये ७.९८ लाख इतका निधी संदर्भाधीन क्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून सचिव ( कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत केला आहे. सदरहू निधी व्यवस्थापकीय संचालक तथा आयुक्त ( कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**
१. राज्यात कृषी उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सन २०२१-२२ मध्ये राबविण्यासाठी अनुसुचित जाती प्रवर्गाचा सन २०२०-२०२१ करिता प्राप्त झालेला केंद्र हिस्सा

रुपये ४५५.००लाख तसेच त्यास समरुप राज्य हिस्सा रुपये ३४३.०० लाख असा एकुण ७.९८ लाख ( सात कोटी अठ्यान्नव लाख) एवढा निधी कृषि आयुक्तालयास वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशिर्षातर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा ( ६० % ) | राज्य हिस्सा (४०%) |
|---|---|---|
| अनुसुचित जाती प्रवर्ग | मागणी क्र.एन-३,<br>००<br>७८९,अनुसुचित जातीसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसुचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१)(०१)कृषी उन्नती योजना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (केंद्र हिस्सा ६०% ) (कार्यक्रम)<br>३३-अर्थसहाय्य ( २४०१ बी०८१) | मागणी क्र.एन-३,<br>००<br>७८९,अनुसुचित जातीसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसुचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१)(०२)कृषी उन्नती योजना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (केंद्र हिस्सा ४०% ) (कार्यक्रम)<br>३३-अर्थसहाय्य ( २४०१ बी०९९) |

३. कोविड-१९ मुळे राज्याची आर्थिक स्थिती अतिशय गंभीर स्वरुपाची राहण्याची शक्यता असल्याने सदर वितरीत निधी खर्च करतांना नियंत्रक अधिकारी यांनी विहित पध्दतीने काटकसरीने उपाययोजना करुन खर्च करावा. सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय/ उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, समाजकल्याण, संबंधित प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्यक महिन्याच्या १० तारखेपासून पाठवणेबाबत दक्षता घ्यावी.

४. विभाग प्रमुख/ नियंत्रक अधिकारी यांनी अनुसुचित जाती घटकांसाठीचा निधी त्याच घटकांवर खर्च होईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला या योजनांवर होणाऱ्या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

५. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करतांना विभागप्रमुख तसेच नियंत्रक अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार, नियमपुस्तिका यामधील वित्तीय नियम तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ०६/०४/२०२१ व दिनांक २४/०६/२०२१ च्या शासन निर्णयातील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ७०८/व्यय-१४, दिनांक १८/०८/२०२१ तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा अनौपचारकि संदर्भ क्रमांक २०८/अर्थसंकल्प, दिनांक १८/११/२०२१ अन्वये त्या विभागांनी दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१११२५१४५९४३१२०१ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येते आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Hemant Gorakhnath Mhapankar
Date: 2021.11.25 15:10:10 +05'30'

**( हे.गो.म्हापणकर )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे प्रधान सचिव.
३) मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सचिव.
४) मा.मंत्री ( फलोत्पादन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे खाजगी सचिव.
५) मा.राज्यमंत्री (फलोत्पादन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे खाजगी सचिव.
६) मा.विरोधी पक्षनेते,महाराष्ट्र विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ सचिवालय,मुंबई.४०००३२.
७) सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
८) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.४०० ०३२.
९) अपर मुख्य सचिव ( नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२.
१०) अपर मुख्य सचिव ( वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११) प्रधान सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२) सचिव (कृषी), कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.३२.
१३) आयुक्त ( कृषि),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, साखर संकुल, शिवाजी नगर,पुणे.
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पणन मंडळ,पुणे.
१६) महालेखापाल-१/२ ( लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा ),मुंबई/नागपुर.
१७) संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे.
१८) सर्व विभागीय कृषी सह संचालक, महाराष्ट्र राज्य.
१९) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२०) सहायक संचालक (लेखा-१),कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२१) महालेखापाल १/२, ( लेखा व अनुज्ञेयता)/लेखा परीक्षा),मुंबई /नागपूर.
२२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२३) संचालक, लेखा व कोषागरे,मुंबई.
२४) संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई.
२५) सह संचालक,लेखा व कोषागरे,संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई ४०० ०३२.
२६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२७) कक्ष अधिकारी ( व्यय १४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२८) कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प ( विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.
२९) कक्ष अधिकारी (२-अे), कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३०) निवड नस्ती ९-अे.